नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४७ Issue - 347 | वार रविवार दि. १० मे २०२६ Blow- Sunday Date 10 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# शुभेंदू अधिकारी मुख्यमंत्रीपदी विराजमान; शपथविधी सोहळा पार पडला उत्साहात

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शपथविधी सोहळ्याला उपस्थिती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नली जिस्सी : पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यासह एनडीएच्या ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत शपथविधी सोहळा पार पडला.

शुभेंदू अधिकारी यांच्या शपथविधी सोहळ्याला गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नितीन नवीन, योगी आदित्यनाथ यांच्यासह महाराष्ट्रातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते.

सुमारे २० राज्यांचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्या या सोहळ्याचे साक्षीदार बनले.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर शुभेंदू अधिकारी यांनी मंचावर उपस्थित असणाऱ्या सगळ्यांची भेट घेतली.

शुभेंदू अधिकारी यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचीही भेट घेतली.

शुभेंदू अधिकारी शपथविधीनंतर जेव्हा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या समोर गेले, तेव्हा योगी आदित्यनाथ यांनी शुभेंदू अधिकारी यांच्या गळ्यात भगवं उपरणं घातलं.

योगी आदित्यनाथ यांनी शुभेंदू अधिकारी यांच्या गळ्यात भगवं उपरणं घातल्यानंतर उपस्थित असणाऱ्या नागरिकांनी टाळ्या वाजवल्या.

# नाशिक 'कॉर्पोरेट जिहाद'प्रकरणी ५० पानांचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर, २५ हून अधिक शिफारसी



मुंबई : नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीतील 'कॉर्पोरेट जिहाद'' प्रकरणी सखोल चौकशी करून राष्ट्रीय महिला आयोगाने तयार केलेला ५० पानांहून अधिकचा सविस्तर अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे, या अहवालात आयोगाने २५ हून अधिक महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या असून, या शिफारसींनुसार दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

नाशिकमधील टीसीएस कंपनीत घडलेल्या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती साधना जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष तथ्यशोधन समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीत हरियाणाचे माजी पोलीस महासंचालक बी. के. सिन्हा, सर्वोच्च न्यायालयाच्या वकील मोनिका अरोरा आणि आयोगाच्या वरिष्ठ समन्वयक लीलाबती यांचा समावेश होता. या समितीने १८ व १९ एप्रिल रोजी नाशिकचा दौरा केला, या दौऱ्यामध्ये पीडित महिला, पोलीस अधिकारी आणि संबंधित घटकांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेतून समोर आलेल्या निष्कर्षांच्या आधारे राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी हा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला.

मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आलेल्या अहवालात कार्यस्थळी महिलांची सुरक्षितता, त्यांचा सन्मान आणि न्याय सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. जबाबदारी निश्चित करण्यासाठी विविध उपाययोजना सुचवतानाच, जबाबदार व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची गरज समितीने अधोरेखित केली आहे.

संजय शिरसाट यांचे धक्कादायक आरोप

दरम्यान, पत्रकार परिषद घेऊन शिरसाट यांनी काही धक्कादायक खुलासे केले आहेत. निदा खान प्रकरणात ज्या नवा घटना घडत आहेत, ती माहिती समोर येत असून अत्यंत धक्कादायक आहे. निदाला तिथे कुणी पाठवलं याचा खुलासा झाला पाहिजे. निदा मुंब्र्याला का गेली नाही? ती एमआयएमच्या संपर्कात होती. इम्तियाज जलील तिला नाशिकला जाऊन भेटले होते. इम्तियाज जलील यांनीच तिला घर देण्यासाठी नगरसेवकाला भाग पाडलं, असा आरोप संजय शिरसाट यांनी केला आहे. धर्मांतर करणं, लव्ह जिहाद करणं, नशेखोर बनवणं अशा तीन स्टेजवर ही यंत्रणा काम करत आहे. हा गंभीर प्रकार आहे. याला राजकीय वळण देऊ नका, असंही त्यांनी म्हटलं आहे.

एमआयएमचा नगरसेवक सहआरोपी

दरम्यान, या प्रकरणातील मुख्य संशयित निदा खान हिला पोलिसांनी अटक केली असून तिला ११ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, निदा खानला लपवून ठेवण्यात 'एमआयएम'च्या एका नगरसेवकाचा हात असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी नगरसेवक मतीन पटेलला (चरींशशप झरींशश्र) ताब्यात घेऊन या प्रकरणात सहआरोपी केले आहे. त्यामुळे हे प्रकरण आता पुढे काय वळण घेते , हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

# तामिळनाडूचा मुख्यमंत्री म्हणून थलपती विजय रविवारी सकाळी शपथ घेणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



चेन्नई : तामिळनाडूचा मुख्यमंत्री म्हणून थलपती विजय उर्फ चंद्रशेखरन जोसेफ विजय रविवारी सकाळी दहा वाजता शपथ घेणार आहे. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी थलपती विजयला सत्ता स्थापनेची संधी दिली आहे. राज्यपालांनी विजयला बुधवार १३ मे २०२६ पर्यंत विधानसभेत बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

याआधी संध्याकाळी थलपती विजयने राज्यपालांना भेटून १२१ आमदारांच्या पाठिंब्याच्या जोरावर सत्ता स्थापनेचा दावा केला. सत्तेसाठी थलपती विजयच्या टीव्हीके या पक्षाने एकूण पाच पक्षांचा पाठिंबा मिळवला आहे. यामुळे सत्ताधारी आमदारांची संख्या १२१ च्या घरात पोहोचली आहे. टीव्हीकेला काँग्रेस, सीपीआय, सीपीआय(एम), व्हीसीके आणि आययूएमएल यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. टीव्हीकेचे १०८ आमदार निवडून आले आहेत. पण विजय दोन मतदारसंघात विजयी झाला आहे. यामुळे पुढील काही दिवसांत तो एका मतदारसंघातील आमदारकीचा राजीनामा देईल आणि तिथे पोटनिवडणूक होईल. अद्याप हा राजीनामा आलेला नसल्यामुळे कागदोपत्री टीव्हीकेचे १०८, काँग्रेसचे ५ तर सीपीआय, सीपीआय(एम), व्हीसीके आणि आययूएमएल यांचे प्रत्येकी दोन असे एकूण १२१ आमदार आहेत. यामुळे २३४ आमदारांच्या तामिळनाडू विधानसभेत विजयकडे बहुमत असल्याचे दिसत आहे.

तामिळनाडूत सत्तास्थापनेसाठी २३४ आमदारांच्या विधानसभेत ११८ आमदारांचा पाठिंबा आवश्यक आहे. विजयकडे यापेक्षा जास्त आमदार आहेत. विजयने दोन पैकी एका मतदारसंघातील आमदारकीचा राजीनामा दिला तर पोटनिवडणुकीचा निकाल येऊन नव्या आमदाराने शपथ घेईपर्यंत सभागृहाची सदस्य संख्या २३३ असेल आणि बहुमताचा जादुई आकडा (मॅजिक फिगर) ११७ असेल.

विजयने पहिल्यांदा राज्यपालांची भेट घेतली त्यावेळी राज्यातील सर्वात मोठा पक्ष म्हणून सत्ता स्थापनेची संधी मिळावी अशा स्वरुपाचे पत्र दिले नव्हते. त्याने स्वतः च्या १०८ आमदारांसह काँग्रेसच्या ५ आमदारांचा पाठिंबा असल्याचे ११२ जणांच्या पाठिंब्याचे पत्र सादर केले होते. यामुळेच राज्यपालांनी विजयला बहुमत घेऊन ये आणि सत्ता स्थापनेचा दावा कर अशी सूचना केली. आता विजयने १२१ आमदारांची जुळवाजुळव झाल्यानंतर राज्यपालांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला.

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीनंतर पश्चिम बंगालमध्ये भाजपने सरकार स्थापन केले आहे. शुभेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

# ऐन उन्हाळ्यात राज्यात जोरदार पाऊस पडणार, हवामान खात्याचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात दुहेरी हवामानाचं चित्र आहे. एकाबाजूला हैराण करून सोडणारा उकाडा तर दुसऱ्या बाजूला मुसळधार पाऊस. राज्यात पुढील आठवड्यात १४ मे ते २० मे या कालावधीत मुसळधार पावसाची शक्यता आहे.

मान्सूनपूर्व पावसाचा तडाखा राज्याला बसेल. या आठवड्याच्या अखेरीस काही भागात पावसाचे आगमन झाले असून तर पुढील आठवड्यात इतर भागात मुसळधार पाऊस राज्याला झोडपून काढण्याची शक्यता आहे. त्यासोबतच राज्यातील अनेक भागात गारपीट होण्याचीही दाट शक्यता आहे.

हवामान विभागानुसार, कोकण क्षेत्रातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट असून जिल्ह्यात काही ठिकाणी उष्ण वारे वाहतील. सिंधुदुर्ग जिल्ह्यासह रत्नागिरीत हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. तर विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि यवतमाळ जिल्ह्यातील काही भागात सोसाट्याचा वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील काही पट्ट्यात गारपिटीचा अंदाज वर्तवला आहे. नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्र, सोलापूर जिल्ह्यात वेगवान वारे वाहतील. विजांचा कडकडाट होईल. तर गारपीट होण्याचीही शक्यता आहे.

रत्नागिरी मध्ये सलग तिसऱ्या दिवशी अवकाळीचे सावट आहे.

संगमेश्वर तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशी पावसाची जोरदार हजेरी लागली. संगमेश्वर बाजारपेठ परिसरातील रस्ते- नाले पावसाने तुडुंब भरले आहे. संगमेश्वर बाजारपेठेमध्ये अचानक आलेल्या पावसामुळे व्यावसायिक व नागरिकांची तारांबळ उडाली.

# विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कारवाई होणार : पणन मंत्री जयकुमार रावल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. मात्र राज्यातील काही भागांत अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी-विक्री करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

पणन संचालनालयाने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून, संबंधितांना वेळोवेळी सूचना देऊनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शासनाने दि. ५ जुलै २०१६ आणि दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या सुधारित तरतुदींनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी आवश्यक परवाना घेणे बंधनकारक केले आहे. बाजार समितीकडून संबंधित परवाना धारकांकडून बाजार शुल्क आकारले जाणार नसले तरी कायद्यानुसार परवाना घेणे आवश्यक राहणार आहे.

## ईडीने संजीव अरोरा यांच्याशी संबंधित १५७ कोटी रुपयांची मालमत्ता तात्पुरती केली जप्त

# मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात पंजाबचे उद्योग मंत्री संजीव अरोरा ईडीच्या ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंजाब : अंमलबजावणी संचालनालयाने म्हणजेच ईडीने आज शनिवार ९ मे रोजी पंजाबचे वीज, उद्योग तसेच गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री संजीव अरोरा यांना कथित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ताब्यात घेतले आहे. ईडीच्या पथकांनी सकाळपासूनच चंदीगड, पंजाब, दिल्ली आणि गुरुग्राम येथील त्यांच्या निवासस्थानांवर आणि आस्थापनांवर छापेमारी केली. माहितीनुसार, चंदीगडच्या सेक्टर-२ येथील सरकारी निवासस्थानी अनेक तास चाललेल्या झडतीनंतर ईडी अधिकाऱ्यांनी अरोरा यांना ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आणि चंदीगड पोलिसांनी मंत्री निवासस्थानाकडे जाणारे सर्व मार्ग बंद केले.

दरम्यान, परकीय चलन उल्लंघन आणि फसव्या निर्यातीच्या कथित प्रकरणात, अंमलबारी संचालनालयाने (ईडी) हॅम्पटन स्काय रियल्टी लिमिटेड आणि पंजाबचे उद्योगमंत्री संजीव अरोरा यांच्याशी संबंधित संस्थांची बँक खाती आणि स्थावर मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे. ही कारवाई १५७.१२ कोटी रुपयांच्या कथित फसव्या निर्यातीशी संबंधित आहे. तपास यंत्रणेनुसार, परकीय चलन व्यवस्थापन कायदा (फेमा), १९९९ च्या कलम ३७(३) आणि आयकर कायद्याच्या कलम १३२(९) अंतर्गत मालमत्ता जप्तीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. महसुली हितांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी आणि पुढील तपासाला मदत करण्यासाठी संबंधित मालमत्ता आणि बँक खाती १८० दिवसांसाठी गोठवण्यात



आली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ईडीने अलीकडेच गुरुग्राममधील उद्योग विहार येथील हॅम्पटन स्काय रियल्टी लिमिटेडच्या कार्यालयात, कंपनीच्या प्रमुख भागधारकांच्या जागांवर आणि संजीव अरोरा, काव्या अरोरा, हेमंत सूद व चंद्र शेखर यांच्या मालकीच्या जागांवर शोध आणि जप्तीची कारवाई केली. या तपासाच्या आधारे, आता या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ईडीचे सुमारे २० सदस्यांचे पथक आठ वाहनांमधून येथे पोहोचले होते. तपास यंत्रणेने दिल्ली, गुरुग्राम आणि चंदीगड येथे एकूण पाच ठिकाणी शोधमोहीम राबवली. यामध्ये अरोरा यांच्या कुटुंबीयांकडून चालवली जाणारी 'हॅम्पटन स्काय रिअल्टी लिमिटेड' कंपनीचे कार्यालयही समाविष्ट असल्याचे सांगितले जात आहे. ईडीचा आरोप आहे की, संजीव अरोरा यांच्या कंपनीमार्फत १०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मोबाईल फोनच्या बनावट जीएसटी खरेदी दाखवण्यात आल्या. तपास यंत्रणेच्या मते, या कथित घोटाळ्यात बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) चा दावा करण्यात आला आणि निर्यातीच्या नावाखाली जीएसटी परतावा तसेच ड्युटी ड्रॉबॅक मिळवण्यात आला. तपासात हेही समोर आले आहे की, दिल्लीतील अनेक बनावट कंपन्यांकडून खरेदीची खोटी बिले तयार करण्यात आली होती, ज्यांचे प्रत्यक्ष अस्तित्व नव्हते. ईडीचा दावा आहे की, या प्रक्रियेच्या माध्यमातून दुबईहून बेकायदेशीर पैसा भारतात परत आणण्याचे म्हणजेच राउंड ट्रिपिंग करण्यात आले, ज्यामुळे सरकारी तिजोरीचे मोठे नुकसान झाले.

# आई : ममतेचा अखंड झरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवी जीवनाच्या प्रवासात अनेक नाती येतात, काही नाती काळाच्या ओघात बदलतात, काही नाती परिस्थितीनुसार दूर जातात; परंतु एक नाते असे असते जे जन्मापूर्वीपासून मृत्यूपर्यंत माणसाला सावलीसारखे साथ देत राहते, ते म्हणजे आईचे नाते. आई ही केवळ जन्मदात्री नसते, तर ती संस्कारांची पहिली शाळा, जीवनमूल्यांची पहिली गुरू, संघर्षात उभी राहणारी पहिली शक्ती आणि संकटसमयी धीर देणारी पहिली मैत्रीण असते. म्हणूनच जगभरात मातृत्वाचा सन्मान करण्यासाठी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मातृ दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक शुभेच्छांचा किंवा सामाजिक माध्यमांवरील संदेशांचा दिवस नसून, आईच्या त्याग, प्रेम, कष्ट आणि ममतेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.

आई या शब्दामध्ये संपूर्ण विश्व सामावलेले आहे. एखाद्या बालकाचा जन्म होण्यापूर्वीच आईचे मातृत्व सुरू होते. स्वतःच्या शरीरात नवजीवन वाढवत असताना ती अनेक वेदना सहन करते. त्या वेदना सहन करताना तिच्या मनात भीतीपेक्षा आनंद अधिक असतो, कारण तिच्या पोटी वाढणाऱ्या जीवाबद्दल तिच्या मनात अपरंपार प्रेम असते. बालक जन्माला आल्यानंतर आई त्याचे पालनपोषण करताना स्वतःच्या सुख-दुःखाचा विचारही करत नाही. रात्रभर जागून मुलाला सांभाळणे, त्याच्या प्रत्येक गरजेची काळजी घेणे, त्याच्या आरोग्यापासून शिक्षणापर्यंत प्रत्येक गोष्टीत लक्ष घालणे हे आईचे जीवनकार्य बनते. म्हणूनच जगातील प्रत्येक महान व्यक्तीच्या यशामागे आईचे योगदान मोठे असते. भारतीय कुटुंब व्यवस्थेत आई ही घराचा केंद्रबिंदू मानली जाते. ती घरातील प्रत्येक सदस्याला प्रेमाने जोडून ठेवते. अनेकदा आर्थिक अडचणी, कौटुंबिक तणाव, सामाजिक दबाव अशा संकटांमध्येही आई आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभी राहते. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून ती आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी आयुष्यभर झटत असते. इतिहास आणि साहित्यामध्ये मातृत्वाचे अनेक प्रेरणादायी संदर्भ आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर जिजाऊंच्या संस्कारांचा खोल प्रभाव होता. जिजाऊंनी शिवरायांना स्वराज्याचे स्वप्न दाखवले आणि न्याय, शौर्य, धर्मनिष्ठा यांचे संस्कार दिले. म्हणूनच जिजाऊंना 'राजमाता' म्हणून गौरविले जाते. यावरून आई ही व्यक्तिमत्त्व घडवणारी महान शक्ती असल्याचे स्पष्ट होते.

मातृ दिनाचा इतिहासही अत्यंत प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील ॲना जार्विस या महिलेने आपल्या आईच्या स्मरणार्थ मातृ दिन साजरा करण्याची संकल्पना मांडली. त्यांच्या आई सामाजिक कार्यात सक्रिय होत्या. त्यांच्या निधनानंतर ॲना जार्विस यांनी आईच्या प्रेमाचा आणि मातृत्वाच्या मूल्यांचा गौरव करण्यासाठी विशेष दिवस साजरा करण्याचा आग्रह धरला. अखेरीस १९१४ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मदर्स डे' अधिकृतपणे साजरा करण्याची घोषणा केली. त्यानंतर जगभरात विविध देशांमध्ये मातृ दिन साजरा केला जाऊ लागला.

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जग झपाट्याने बदलले आहे. जीवनशैली बदलली, कुटुंबव्यवस्था बदलली, नात्यांचे स्वरूपही बदलले; परंतु आईचे महत्त्व अजूनही अबाधित आहे. उलट धकाधकीच्या जीवनात आईची भूमिका अधिक महत्त्वाची बनली आहे. नोकरी, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक जबाबदाऱ्या यांचा ताण वाढत असताना कुटुंब सांभाळण्याची मोठी जबाबदारी आईवर असते. अनेक महिला घर आणि करिअर यांचा समतोल साधत आपल्या कुटुंबासाठी झटताना दिसतात. त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्या तरी घरातील जबाबदाऱ्या कमी झालेल्या नाहीत. त्यामुळे आधुनिक आईचे जीवन अधिक संघर्षमय झाले आहे.

ग्रामीण भागातील आईचे जीवन विशेषतः कष्टमय असते. शेतीची कामे, जनावरांची देखभाल, घरातील कामे, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा अनेक जबाबदाऱ्या ती सांभाळत असते. अनेकदा तिला स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठीही वेळ मिळत नाही. तरीही ती तक्रार न करता आपल्या कुटुंबासाठी राबत राहते. ग्रामीण महिलांच्या या श्रमाचे आणि योगदानाचे योग्य मूल्यमापन समाजाने करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील अनेक आई मुलांच्या शिक्षणासाठी स्वतः उपाशी राहून त्यांना शिकवतात. त्यामुळेच शिक्षणाच्या माध्यमातून अनेक मुले प्रगतीच्या शिखरावर पोहोचतात.

शहरी भागातील मातृत्वालाही वेगळी आव्हाने आहेत. वाढती स्पर्धा, महागाई, लहान कुटुंब पद्धती, व्यावसायिक ताण आणि बदलती सामाजिक मूल्ये यामुळे शहरी महिलांवर मानसिक दबाव वाढला आहे. मुलांच्या शिक्षणासाठी, करिअरसाठी आणि सुरक्षित भविष्यासाठी आई सतत चिंतेत असते. डिजिटल युगात मुलांवर होणारे सामाजिक माध्यमांचे परिणाम, वाढती व्यसनाधीनता, हिंसक प्रवृत्ती आणि भावनिक दुरावा या समस्यांमुळे मातृत्वाची जबाबदारी अधिक गुंतागुंतीची बनली आहे. अशा परिस्थितीत आई केवळ पालनकर्ती राहत नाही, तर ती मार्गदर्शक, समुपदेशक आणि मानसिक आधारही बनते. आईच्या ममतेला कोणतीही सीमा नसते. मुलगा गरीब असो किंवा श्रीमंत, यशस्वी असो किंवा अपयशी, आईचे प्रेम कधी कमी होत नाही. मुलाने कितीही चुका केल्या तरी त्याला माफ करण्याची ताकद आईमध्ये असते. म्हणूनच आईचे प्रेम निरपेक्ष मानले जाते. जगात अनेक नाती स्वार्थावर आधारलेली असू शकतात; परंतु आईचे प्रेम केवळ ममतेवर आधारित असते. मुलाच्या आनंदात आनंद मानणे आणि त्याच्या दुःखात दुःखी होणे ही आईची नैसर्गिक भावना असते.

आजच्या काळात वृद्धाश्रमांची वाढ ही चिंतेची बाब आहे. अनेक वृद्ध माता-पिता आपल्या मुलांपासून दूर वृद्धाश्रमात जीवन जगताना दिसतात. आधुनिक जीवनशैली, करिअरची धावपळ आणि बदलती कौटुंबिक मूल्ये यामुळे काही ठिकाणी पालकांविषयीची संवेदनशीलता कमी होताना दिसते. ज्यांनी आयुष्यभर मुलांसाठी कष्ट केले, त्याच आई-वडिलांना वृद्धापकाळात एकटेपण सहन करावे लागणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. मातृ दिन साजरा करताना समाजाने या वास्तवाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. आईचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वर्तनातून दिसला पाहिजे.

भारतीय स्त्रियांनी मातृत्वासोबतच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे. शिक्षण, विज्ञान, साहित्य, राजकारण, क्रीडा, संरक्षण, कला, उद्योग अशा प्रत्येक क्षेत्रात महिलांनी यश मिळवले आहे. या यशामागे त्यांची जिद्द आणि कुटुंबासाठीची बांधिलकी दिसून येते. अनेक महिला आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांसोबत मुलांचे संगोपनही यशस्वीपणे करतात. त्यामुळे आधुनिक मातृत्व अधिक सक्षम आणि बहुआयामी बनले आहे.

कोरोना महामारीच्या काळात आईचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवले. लॉकडाऊनच्या काळात संपूर्ण कुटुंब घरात असताना महिलांवर कामाचा ताण वाढला होता. घरातील सर्व सदस्यांची काळजी घेणे, स्वच्छता राखणे, मुलांच्या ऑनलाइन शिक्षणाची जबाबदारी सांभाळणे, आजारी व्यक्तींची सेवा करणे अशा अनेक भूमिका महिलांनी निभावल्या. आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेक महिला डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी यांनी स्वतःच्या कुटुंबापेक्षा समाजसेवेला प्राधान्य दिले. या काळात मातृत्वाची संवेदनशीलता आणि त्याग समाजाने जवळून अनुभवला.

आई ही मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची पहिली शिल्पकार असते. बालपणात मिळालेले संस्कार व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर प्रभाव टाकतात. प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य, करुणा, परिश्रम, सामाजिक जबाबदारी यांसारखी मूल्ये मुलांना आईकडूनच शिकायला मिळतात. आई मुलांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करते. मुलांना संकटांचा सामना करण्याची ताकद देते. म्हणूनच समाजाच्या नैतिक बांधणीमध्ये मातृत्वाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

साहित्य, कला आणि संस्कृतीमध्ये आईचे स्थान विशेष आहे. मराठी साहित्यात अनेक कवींनी आणि लेखकांनी आईच्या ममतेचे हृदयस्पर्शी चित्रण केले आहे. कविवर्य कुसुमाग्रज, साने गुरुजी, वि. स. खांडेकर, बहिणाबाई चौधरी यांसारख्या साहित्यिकांनी आईच्या प्रेमाचा गौरव केला आहे. साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक मातृत्वाच्या संवेदनशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. या पुस्तकातून आईचे संस्कार, त्याग आणि नैतिक मूल्ये प्रभावीपणे समोर येतात. मराठी चित्रपट आणि संगीतामध्येही आईवरील अनेक भावस्पर्शी गीते लोकप्रिय आहेत.

मातृत्व हे केवळ जैविक नाते नसून भावनिक आणि सांस्कृतिक नाते आहे. अनेक महिला स्वतःची मुले नसतानाही इतर मुलांचे संगोपन करतात. अनाथ मुलांना आश्रय देणाऱ्या महिला, समाजसेविका, शिक्षिका आणि सेवाभावी स्त्रिया या देखील मातृत्वाचेच रूप आहेत. समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू मुलांसाठी कार्य करणाऱ्या महिलांनी मातृत्वाला व्यापक सामाजिक स्वरूप दिले आहे.

स्त्री सक्षमीकरणाच्या चर्चेमध्ये मातृत्वाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. महिलांना मातृत्वासोबत करिअर आणि वैयक्तिक आयुष्य यांचा समतोल साधण्यासाठी समाज आणि शासनाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. प्रसूती रजा, बालसंगोपन केंद्रे, सुरक्षित कार्यस्थळे, आरोग्य सुविधा आणि समान संधी यामुळे महिलांचे जीवन अधिक सुलभ होऊ शकते. मातृत्व ही केवळ महिलांची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, ही जाणीव विकसित होणे आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात अनेकदा कुटुंबातील संवाद कमी होताना दिसतो. मोबाइल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांमुळे माणसे आभासी जगात अधिक रमू लागली आहेत. अशा परिस्थितीत कुटुंबातील भावनिक नातेसंबंध टिकवून ठेवण्याचे मोठे कार्य आई करत असते. ती कुटुंबाला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करते. मुलांमध्ये संवेदनशीलता, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

मातृ दिन साजरा करताना केवळ भेटवस्तू देणे किंवा शुभेच्छा देणे पुरेसे नाही. आईच्या भावना समजून घेणे, तिच्या कष्टांची जाणीव ठेवणे आणि तिला सन्मानाने वागवणे अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा आई स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते. त्यामुळे तिच्या आरोग्याची काळजी घेणे, तिला विश्रांती मिळेल याची व्यवस्था करणे, घरकामात मदत करणे आणि तिच्यासोबत वेळ घालवणे ही खरी कृतज्ञता ठरते.

समाजातील अनेक महिलांना आजही शिक्षण, आरोग्य, पोषण आणि आर्थिक स्वावलंबनाच्या समस्या भेडसावत आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागातील गर्भवती महिलांना योग्य आरोग्य सुविधा मिळत नाहीत. कुपोषण, बालविवाह, मातामृत्यू आणि लैंगिक भेदभाव या समस्या अजूनही गंभीर आहेत. मातृत्वाचा सन्मान करायचा असेल तर महिलांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक आईला सुरक्षित, सन्मानजनक आणि आरोग्यपूर्ण जीवन मिळणे हीच मातृ दिनाची खरी भावना आहे.

भारतीय कुटुंब व्यवस्थेत आई अनेकदा स्वतःच्या इच्छा आणि स्वप्ने बाजूला ठेवते. मुलांचे शिक्षण, कुटुंबाचे भविष्य आणि घराची जबाबदारी यासाठी ती स्वतःच्या आवडी-निवडींचा त्याग करते. अनेक महिलांना आपल्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे महिलांना शिक्षण, रोजगार आणि आत्मविकासाच्या संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे कर्तव्य आहे.

आई ही संकटसमयी धीर देणारी शक्ती असते. जीवनात अपयश आले, अडचणी निर्माण झाल्या किंवा माणूस निराश झाला तर त्याला उभारी देणारे पहिले व्यक्तिमत्त्व म्हणजे आई असते. तिचे शब्द माणसाला नवसंजीवनी देतात. म्हणूनच अनेक महान व्यक्तींनी आपल्या यशाचे श्रेय आईला दिले आहे. आईचा आशीर्वाद आणि विश्वास माणसाला मोठ्या संघर्षातून पुढे जाण्याची प्रेरणा देतो. भारतीय लोकसंस्कृतीमध्ये आईचे रूप विविध प्रकारे व्यक्त झाले आहे. लोकगीते, अभंग, ओव्या, म्हणी आणि कथांमध्ये मातृत्वाचे भावनिक चित्रण आढळते. ग्रामीण भागातील स्त्रिया काम करताना म्हणणाऱ्या ओव्यांमध्ये आईचे दुःख, प्रेम आणि संघर्ष प्रतिबिंबित होतात.

आई आणि पर्यावरण यांच्यामध्येही एक प्रतीकात्मक साम्य आहे. जशी आई आपल्या मुलांचे संगोपन करते, तसेच पृथ्वी संपूर्ण सृष्टीचे पालनपोषण करते. म्हणूनच पृथ्वीला 'धरतीमाता' म्हटले जाते. पर्यावरणाचे संरक्षण करणे म्हणजे भविष्यातील पिढ्यांचे रक्षण करणे होय. मातृत्वाचा संदेश माणसाला संवेदनशीलता, जपणूक आणि सहजीवनाची शिकवण देतो.

मुलांच्या मानसिक आरोग्यामध्ये आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात अनेक मुलांवर शैक्षणिक आणि सामाजिक दबाव वाढत आहे. नैराश्य, एकटेपणा, ताणतणाव आणि भावनिक अस्थिरता यांसारख्या समस्या वाढताना दिसतात. अशा वेळी आई मुलांसाठी भावनिक आधार बनते. मुलांचे मन समजून घेणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि त्यांना प्रेमाने मार्गदर्शन करणे हे मातृत्वाचे महत्त्वाचे कार्य आहे.

समाजामध्ये स्त्री-पुरुष समानतेची जाणीव निर्माण करण्यासाठी मातृत्वाचा योग्य सन्मान होणे आवश्यक आहे. महिलांना दुय्यम स्थान देणारी मानसिकता बदलली पाहिजे. आईचा सन्मान करणारा समाज अधिक संवेदनशील आणि प्रगतिशील असतो. महिलांविरुद्ध होणारे अत्याचार, भेदभाव आणि हिंसा थांबवण्यासाठी सामाजिक परिवर्तनाची गरज आहे. मुलांना बालपणापासून स्त्रियांचा आदर करण्याचे संस्कार देणे हीही आईची महत्त्वाची भूमिका आहे.

मातृ दिन हा केवळ एक उत्सव नाही, तर आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण आपल्या आईसाठी किती वेळ देतो? तिच्या भावना कितपत समजून घेतो? तिच्या कष्टांचे मूल्य किती जाणतो? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. आईला महागड्या भेटवस्तूंपेक्षा प्रेम, आदर आणि सहवास अधिक महत्त्वाचा वाटतो. तिच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि आनंद हेच मुलांसाठी सर्वात मोठे यश असते.

आज अनेक माता आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी दूर पाठवतात. मुलांच्या प्रगतीसाठी स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवून त्या त्यांना प्रोत्साहन देतात. मुलगा किंवा मुलगी परदेशात असली तरी आईचे मन सतत त्यांच्या काळजीत गुंतलेले असते. तंत्रज्ञानामुळे अंतर कमी झाले असले तरी आईच्या प्रत्यक्ष सहवासाची जागा कोणतीही गोष्ट घेऊ शकत नाही.

मातृत्वाचे आणखी एक महत्त्वाचे रूप म्हणजे दत्तक मातृत्व. अनेक कुटुंबे अनाथ मुलांना दत्तक घेऊन त्यांना प्रेम आणि आधार देतात. अशा मातांनी मातृत्वाची व्याख्या अधिक व्यापक केली आहे. रक्ताच्या नात्यापेक्षा प्रेमाचे नाते अधिक महत्त्वाचे असते, हे या उदाहरणांतून दिसून येते.

भारतीय समाजामध्ये सिंगल मदर्स म्हणजेच एकल मातांची संख्या वाढताना दिसत आहे. विविध सामाजिक आणि वैयक्तिक कारणांमुळे अनेक महिला एकट्याने मुलांचे संगोपन करतात. अशा महिलांना आर्थिक, सामाजिक आणि मानसिक आव्हानांचा सामना करावा लागतो. तरीही त्या खंबीरपणे आपल्या मुलांचे भविष्य घडवण्यासाठी संघर्ष करतात. समाजाने अशा मातांकडे सहानुभूतीने आणि सन्मानाने पाहण्याची गरज आहे. आईच्या कष्टांची जाणीव अनेकदा मुलांना उशिरा होते. बालपणात आईचे प्रेम सहज मिळत असल्याने त्याची किंमत समजत नाही; परंतु आयुष्याच्या विविध टप्प्यांवर आईच्या त्यागाचे महत्त्व लक्षात येते. म्हणूनच आई जिवंत असताना तिच्यावर प्रेम व्यक्त करणे आवश्यक आहे. अनेकदा माणसे आई गेल्यानंतर तिच्या आठवणींमध्ये हरवतात; परंतु खरा सन्मान तिच्या आयुष्यातच केला पाहिजे.

मातृ दिनाच्या निमित्ताने समाजाने महिलांच्या आरोग्याविषयी अधिक जागरूक होण्याची गरज आहे. गर्भवती महिलांचे आरोग्य, पोषण, मानसिक स्वास्थ्य आणि प्रसूतीनंतरची काळजी यावर विशेष लक्ष दिले पाहिजे. ग्रामीण भागात आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्याची गरज आहे. मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे आणि प्रत्येक महिलेला सुरक्षित मातृत्वाचा अधिकार मिळवून देणे हे समाज आणि शासनाचे कर्तव्य आहे.

आई ही संस्कृतीची वाहक असते. भाषा, परंपरा, सण-उत्सव, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणीवा या सर्व गोष्टी आईकडून पुढील पिढीकडे जातात. घरामध्ये बोलली जाणारी भाषा, आचार-विचार आणि संस्कार यामध्ये आईची भूमिका केंद्रस्थानी असते. त्यामुळे समाजाच्या सांस्कृतिक सातत्यामध्ये मातृत्वाचे योगदान अत्यंत मोठे आहे.

शिक्षण क्षेत्रातही अनेक मातांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक निरक्षर माता आपल्या मुलांना शिकवण्यासाठी संघर्ष करतात. स्वतः शिक्षण न मिळाल्याची खंत त्या मुलांच्या शिक्षणाद्वारे दूर करण्याचा प्रयत्न करतात. गरीब कुटुंबातील अनेक माता मजुरी करून मुलांचे शिक्षण पूर्ण करतात. अशा मातांचा संघर्ष समाजासाठी प्रेरणादायी आहे.

मातृत्वाचा संबंध केवळ भावना आणि त्यागाशी नसून शक्ती आणि नेतृत्वाशीही आहे. इतिहासामध्ये अनेक महिलांनी संकटसमयी नेतृत्व करून समाजाला दिशा दिली आहे. जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, यांसारख्या महिलांनी मातृत्वाच्या मूल्यांना सामाजिक परिवर्तनाशी जोडले. त्यांनी समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य करून स्त्रीशक्तीचे सामर्थ्य सिद्ध केले. आजच्या बदलत्या काळात मुलांनीही आपल्या आई-वडिलांप्रती जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. करिअर, पैसा आणि वैयक्तिक यशाच्या मागे धावताना कुटुंबाकडे दुर्लक्ष होऊ नये. आई-वडिलांसोबत संवाद साधणे, त्यांना भावनिक आधार देणे आणि त्यांच्या गरजांची काळजी घेणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. मातृ दिनाचा खरा संदेश म्हणजे प्रेम, कृतज्ञता आणि संवेदनशीलता. आईचे ऋण कधीही फेडता येत नाही; परंतु तिचा सन्मान करून, तिच्या कष्टांची जाणीव ठेवून आणि तिच्या स्वप्नांना आधार देऊन आपण तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकतो. समाजातील प्रत्येक महिलेला सुरक्षित, सन्मानजनक आणि आनंदी जीवन मिळाले तरच मातृ दिनाचा उत्सव अर्थपूर्ण ठरेल.

आजच्या वेगवान जगात माणसांमधील भावनिक नाती टिकवून ठेवणे मोठे आव्हान बनले आहे. अशा काळात आईचे प्रेम माणसाला माणुसकीची जाणीव करून देते. आईच्या ममतेमध्ये स्वार्थ नसतो, दिखावा नसतो; असते ती फक्त निस्सीम करुणा. म्हणूनच आई हा प्रत्येकाच्या जीवनातील सर्वात मोठा आधार असतो.

मातृ दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने एक संकल्प केला पाहिजे की, आईचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित ठेवायचा नाही. तिच्या भावना समजून घेऊन, तिच्या आरोग्याची काळजी घेऊन, तिच्यासोबत वेळ घालवून आणि तिच्या स्वप्नांना पाठबळ देऊन आपण तिच्या आयुष्याला आनंदी बनवूया. कारण आई आनंदी असेल तर कुटुंब आनंदी राहील आणि कुटुंब आनंदी असेल तर समाजही अधिक संवेदनशील, सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनेल.

आई ही जीवनाची पहिली कविता आहे, पहिली प्रार्थना आहे, पहिली शाळा आहे आणि पहिला देव आहे. तिच्या ममतेचा सुगंध आयुष्यभर मनात दरवळत राहतो. म्हणूनच मातृ दिन हा केवळ कॅलेंडरवरील दिवस नसून, मानवी संवेदनशीलतेचा, प्रेमाचा आणि कृतज्ञतेचा उत्सव आहे. प्रत्येकाच्या जीवनात आईचे स्थान अद्वितीय आहे आणि म्हणूनच जगातील कोणतीही शक्ती आईच्या प्रेमाची बरोबरी करू शकत नाही. मातृत्वाच्या या पवित्र भावनेला प्रणाम करताना एवढेच म्हणावेसे वाटते की, 'आई' हा शब्द उच्चारला की मनाला मिळणारी शांतता आणि आधार जगातील कोणत्याही संपत्तीपेक्षा अधिक मौल्यवान आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल** – bagate.rajendra5@gmail.com

## पालकमंत्री सोमवारी पंढरपूर दौऱ्यावर कॉरिडोर बाबत बैठक होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील पालकमंत्री जयकुमार गोरे पंढरपूर दौऱ्यावर येत आहेत. ११ मे रोजी सोमवारी कॉलर बाबत बैठक घेणार असून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारकाची भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे समजते.

पंढरपूर मध्ये येणाऱ्या भाविक भक्तांना चांगल्या सुख सुविधा मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाने पंढरपूरला क्वार्टर करण्याचा निर्णय घेतला आहे. काही दिवसापूर्वी शिखर समितीने पंढरपूरला परडाची मंजुरी दिली असली मुळे. सुमारे ४५०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्यामुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत असलेली दिसून येत आहे. कॉरडरमध्ये ज्याची घरी दुकाने जात असल्याचे त्यामुळे त्याला विरोध होत असल्याची दिसून येऊ लागले आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे पंढरपूर दौऱ्यावर आल्यानंतर राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकाच्या भूमिपूजन करणार आहेत. यानंतर कॉर्डर बाबतची बैठक घेणार आहे. यावेळी कॉलर बाधित नागरिकांची भेट ही पालकमंत्री घेणार असल्याचे समजते. एकंदरीत पंढरपूर कोर्टात बाबतचे वातावरण तापू लागले आहे.

# जनतेचा विश्वास आणि महाराष्ट्र पोलिसांची निष्ठा : सुरक्षित समाजाची खरी ताकद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्र पोलीस हे राज्यातील जनतेच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्य करणारे एक अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदार घटक आहेत. समाजामध्ये शांतता, कायदा आणि सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सतत सजग असते. कोणतीही आपत्ती, गुन्हा, अपघात किंवा संकटाची वेळ आली तर सर्वप्रथम घटनास्थळी पोहोचणारा घटक म्हणजे पोलीस. त्यामुळे समाजाने पोलिसांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक आणि संवेदनशील असणे आवश्यक आहे.

पोलीस हे केवळ गणवेशातील कर्मचारी नसून ते समाजाचे रक्षणकर्ते आहेत. दिवस असो किंवा रात्र, पाऊस असो किंवा उन्हाळा, सण-उत्सव असो किंवा वैयक्तिक अडचणी पोलीस आपल्या कर्तव्यापासून कधीही मागे हटत नाहीत. स्वतःच्या कुटुंबाची चिंता बाजूला ठेवून राज्यातील जनताच आपले कुटुंब आहे, ही भावना मनामध्ये ठेवून ते काम करतात. घडलेल्या घटनांची शहानिशा करून पुरावे गोळा करणे, गुन्हेगारांचा शोध घेणे आणि पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी ते प्रामाणिकपणे प्रयत्नशील असतात.

अनेक वेळा पोलीस आपल्या जीवाची पर्वा न करता गुन्हेगारांचा सामना करतात. दंगली, दहशतवादी हल्ले, गुन्हेगारी कारवाया किंवा विविध धोकादायक प्रसंगांमध्ये अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी शहीद झाले आहेत. समाजाच्या सुरक्षेसाठी त्यांनी दिलेले बलिदान हे अत्यंत प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे. काही प्रसंगी एखाद्या पोलिसाकडून भ्रष्टाचार किंवा चुकीचे वर्तन घडते, हे वास्तव नाकारता येणार नाही. परंतु एका व्यक्तीच्या चुकीमुळे संपूर्ण पोलीस प्रशासनाला दोषी ठरविणे ही मोठी शोकांतिका आहे. जसे प्रत्येक क्षेत्रात चांगले आणि वाईट प्रवृत्तीचे लोक असतात, तसेच पोलीस विभागातही काही अपवाद आढळू शकतात. मात्र बहुसंख्य पोलीस प्रामाणिकपणे आणि निष्ठेने जनतेची सेवा करत असतात, हे विसरून चालणार नाही. समाज आणि पोलीस यांच्यामध्ये विश्वासाचे आणि सहकार्याचे नाते निर्माण झाले पाहिजे. नागरिकांनी पोलिसांशी सुसंवाद ठेवला, त्यांच्या कामाचा आदर केला आणि योग्य सहकार्य केले तर समाजामध्ये अधिक सुरक्षित आणि सकारात्मक वातावरण निर्माण होईल. पोलिसांनाही आपल्या कार्याचा अभिमान वाटला पाहिजे की, मी महाराष्ट्र पोलीस आहे आणि मला समाजसेवेची संधी मिळत आहे.

आज गरज आहे ती पोलिसांविषयीचा नकारात्मक दृष्टिकोन बदलण्याची. समाजाचे संरक्षण करणाऱ्या या यंत्रणेला केवळ टीकेच्या नजरेने न पाहता त्यांच्या त्याग, समर्पण आणि सेवाभावाचा सन्मान करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. जनतेचा विश्वास आणि पोलिसांची निष्ठा यांच्यामुळेच सुरक्षित, सक्षम आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती होऊ शकते.

**– प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे**
**सहयोगी प्राध्यापक**
**प्राणीशास्त्र विभाग**
**शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय परंडा.**
**जिल्हा धाराशिव.**
**राज्य समन्वयक**
**फुले शाहू आंबेडकर विद्वत सभा, महाराष्ट्र राज्य.**
**मो. ९४२१४४४८०१. ९८३४७५८७०९**

## सिन्नूर येथे श्री सच्चिदानंद शिवाजी महाराज यांच्या३४ व्या जत्रा महोत्सव प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील सिन्नूर येते परमपूज्य श्री सद्गुरु सच्चिदानंद शिवयोगी शांतीमठ सिन्नर येथे फ्रॉम करण्यात आल्या या यात्रा निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आला दिनांक ९-५-२६ते १५-५-२६ पर्यंत श्रीमद भागवत महापुराण दिव्य सानिध्य परम पूज्य आचार्य श्री जगदीश्वरानंद शिवायोगी महाराज यांच्या अमृतवाणी प्रारंभ होत आहे तरी या कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी सिन्नर गावातील नागरिक सदभक्त मोठे प्रमाणात मस्त राहून यशस्वीरे ती पार पाडण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन ॲंड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# समाजकल्याण खात्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे : सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

## सामजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : सामाजिक न्याय विभागाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन दिवसेंदिवस बदलत आहे, आगामी काळातही कामात सातत्य ठेवून या खात्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी आणखीण चांगले काम अधिकाऱ्यांनी करावे व 'सामाजिक न्याय' संकल्पना डोळ्यासमोर ठेवून समाजातील शेवटच्या घटकांना न्याय देण्यासाठी काम करावे. विभागाला अधिक सक्षम करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहावे, असे आवाहान राज्याचे सामजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केले.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेच्यवतीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लोणा-वळा येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विभागाचे सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, सामाजिक न्याय खात्यातील सहसचिव सो.ना. बागुल उपसचिव वर्षा देशमुख अव्वर सचिव सतीश

खैरमोडे,राज्यातील प्रादेशिक उपायुक्त, सहायक उपायुक्त उपस्थित होते.

श्री. शिरसाट म्हणाले, विभागाच्यावतीने विद्यार्थी घडविण्याचे फार मोठे करण्यात येते.

विद्यार्थीच्या जीवनात आमूलाग्र घडविण्यासाठी वसतिगृहाचे अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळे राज्यात वसतिगृह उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये देण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये बदल करुन त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करण्यात यावा.

विभागामध्ये चांगले काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रबोलन देण्यात यावे. त्यांनीही विभागात आपल्या कामाच्या माध्यमातून वेगळी छाप निर्माण करावी, राज्याला दिशादर्शक होईल यादृष्टीने नवनवीन उपक्रम राबवावे, या उपक्रमाचे इतरांनी अनुकरण करण्याची गरज आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांकरिता कार्यालयाच्याजवळ निवासस्थान उपलब्ध करण्यासोबतच सोसायटी स्थापन करण्याबाबत नियोजन करावे.

कार्यशाळा ही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या विचारांची देवाण-घेवाण तसेच त्यांच्या अडीअडचणी मांडण्याची व्यासपीठ आहे, त्यामुळे या कार्यशाळेचा आनंद घेत विचाराची देवाण-घेवाण करावी. याठिकाणी झालेले निर्णय, चर्चेच्या अनुषंगाने विभागात प्रभावीपणे अंमलबजावणी करून आगामी सकारात्मक परिणाम दिसले पाहिजे.

राज्याच्या अर्थसंकल्पात विभागासाठी मंजूर झालेला निधी वेळेत खर्च झाले पाहिजे, यादृष्टीने काम करावे असेही शिरसाट म्हणाले.

या वेळी प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे म्हणाले, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. विभागाच्यवतीने समाजातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, नागरिक आदी घटकांसाठी लोक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची प्रभावीपणे राबवून त्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी काम करावे.येत्या काळात शिक्षण, पायाभूत सुविधा, उद्योजकता, सामजिक सुरक्षा आणि तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर या पाच पैलूंवर काम करुन विभागाची



धोरण ठरविण्यात येणार आहे, त्यामुळे विभागाने विकसित महाराष्ट्र २०२७ चा दृष्टिकोन समोर ठेवून प्रभावीपणे काम करावे, असेही डॉ. कांबळे म्हणाले.

श्रीमती मुधोळ-मुंडे म्हणाल्या,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागावतीने येत्या काळात नवनवीन धोरणे, योजना राबविण्याचा मानस आहे. केंद्र सरकारच्या 'आय-गॉट' संकेतस्थळाच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. अधिकारी-कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा या वर्षी प्रथमच आयोजित करण्यात आल्या, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ऊसतोड कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि तृतीयपंथीयांच्या कल्याकरिता काम करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, या कार्यशाळेचा विभागाला निश्चित उपयोग होईल, असेही श्रीमती मुधोळ-मुंडे म्हणाल्या.

यावेळी दिवसभर विविध योजनांच्या संदर्भात प्रादेशिक उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांनी सादरीकरण केले कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार बार्टीचे विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

# सदाशिवनगर साखर कारखान्याच्या विस्तारीकरण आस्वानी प्रकल्पाला पीडित नागरिक व शेतकरी यांचा तीव्र विरोध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड पोस्ट सदाशिवनगर पुरंदवडे तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर या कारखान्याच्या प्रास्ताविक मॉलिसीस बी व सी वर आधारित विस्तारीकरण आसवानी प्रकल्प क्षमता ३० .की.ली. प्रतिपादन वरून ४५ .कि.ली. प्रति दिन पर्यंत तसेच प्रस्तावित विस्तारीकरण ऊस गाळप क्षमता २५०० मीटर प्रतिदिन वरून सात हजार बॅटरी टन प्रतिदिन ची स्थापना करण्याबाबत दिनांक १८ ५ २०२६ रोजी जाहीर जन सुनावणीसाठी सहसंचालक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण ण मंडळ मुख्यालय यांना पत्र व्यवहार केलेला असून सदर प्रकल्पाबाबत काही सूचना मत टीका टिपणी किंवा अक्षर लेखी स्वरूपात दिनांक १८ ५ २०२६ रोजी प्राप्त झाल्यास याची नोंद घेऊन या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येईल असा पत्र व्यवहार निखिल मोरे उपप्रादेशिक अधिकारी सोलापूर यांनी दिनांक १६/० ४/ २०२६ रोजी पत्र व्यवहार केलेला आहे. दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रांमध्ये इंग्रजी भाषेत तसेच दैनिक संचार या वृत्तपत्रांमध्ये मराठी भाषेमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी सोमवारी दिनांक १८ ५ २०२६ रोजी दुपारी चार वाजता श्री शंकर सहकारी साखर कारखाना या कारखाना प्रकल्प स्तरा-वर आयोजित करण्यात आलेले आहे सदाशिवनगर साखर कारखान्याच्या विस्तारीकरण आस्वानी प्रकल्पाला पीडित नागरिक शेतकरी तसेच पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था स्थानिक रहिवासी यांचा तीव्र विरोध आहे व ३० के.ली. प्रतिदिन क्षमता असताना दूषित पाण्याने पुरंदवडा सदाशिवनगर व अन्य गावातील स्थानिक नागरिक शेतकरी त्रस्त आहेत पहिल्यांदा दूषित पाण्याचा बंदोबस्त करा आणि मगच विस्तारीकरण करा असा स्थानिक नागरिकांचा सूर येत आहे. प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी पदाधिकारी व नेते हवेत आहेत व शेतकरी स्थानिक नागरिक मात्र दूषित व खराब पाण्याने त्रस्त आहेत पिढी शेतकरी व स्थानिक नागरिक तसेच पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था जन आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

# अप्रेंटिस विद्यार्थी यांनी पुढील शिक्षण घेणे ही काळाची गरज : उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना महावितरण मध्ये घेतलेल्या एक वर्षाच्या कामकाजाचा अनुभव ही भविष्यातील वाटचालीसाठी मोलाची शिदोरी ठरेल, तसेच पुढील शिक्षण चालू ठेवून उच्चशिक्षित व्हा, असे प्रतिपादन उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे यांनी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी केले.



महावितरणच्या दिंडोरी उपविभागाच्या वतीने आयोजित केलेला प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ विविध कार्यक्रमांनी पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिंडोरी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे होते. यावेळी अध्यक्षस्थाणाहून बोल-ताना नागरे म्हणाले की, ITI झाल्यानंतर असलेला अप्रेंटिस हा एक वर्षाचा प्रशिक्षणार्थी काळ हा भविष्यासाठी बरीच मोठी शिकवण व अनुभव देत असतो, आणि हाच अनुभव जर महावितरण सारख्या मोठ्या कंपनीमध्ये असेल तर ती शिदोरी पुढील वाटचालीत पावलो पावली कामी येते आणि याबरोबरच आपल्या आयुष्यामध्ये अध्यात्म जर असेल तर आपण सर्वच क्षेत्रात यशस्वी होतो, म्हणून साधना करत रहा, तसेच पुढील वाटचालीसाठी त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी देखील मनोगत व्यक्त करून अधिकारी वर्ग व कर्मचारी यांचे आभार मानले. दरम्यान विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम देखील पार पडले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक अभियंता पल्लवी शिंदे यांनी तर आभार रंजना कोरडे यांनी मानले. यावेळी व्यासपीठावर सहाय्यक अभियंता प्रवीण उगलमुगले, सोनल नागरे, धनराज ठेपणे, महेश पवार आदींसह प्रमोद पवार, ज्ञानेश्वर बोरसे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र पैठने यांनी केले.

**रुचकरांची होणार मेजवानी : आंब्याची सर्व पदार्थ चाखायला मिळणार**

# यंदा गावरान आंबा मनसोक्त बहरून फुललाय...!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी : आंबा हे आपले राष्ट्रीय फळ आहे. पण गेल्या दोन वर्षापासून गावरान आंबा दुर्मिळ ठरला होता. यावर्षी निसर्गाचे बदललेले हवामान व अप्रतिकूल वातावरणामुळे गावरान आंब्याला सलग दोन वर्षांपासून तडाखा बसला होता. पण यावर्षी पोषक वातावरण व मुबलक पाणी, हवामान चांगले असल्यामुळे यावर्षी आंब्याच्या वृक्षाला चांगली फळधारणा लागली आहे. त्यामुळे लवकर चाखायला मिळेल अशी आशा शेतकऱ्यांना लागली आहे. गावरान आंबा मनसोक्त बहरून फुललाय...!


अर्जुनीमोरगाव तालुक्यातील येरंडी, बाराभाटी, देवलगाव या ठिकाणच्या आमराई व शेतातील बागा प्रसिद्ध आहे.

पण आज घडीला आमराई नावाला शिल्लक असल्याचे दिसत आहे. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात आंब्याचे एकतरी झाड असायचे. पण ते आता काहीच शिल्लक राहिली नाहीत. तुरळक ठिकाणीच गावरान आंब्याचे झाड पाहावयास मिळतात.

एकेकाळी आंब्यावरच शेतकऱ्यांची व्यवसाय चालायचे. रोजगाराला कामं मिळायचे. चार पैसे शिल्लक राहायचे. परंतु मागील दोन वर्षापासून बघितले तर निसर्गाच्या चक्रामुळे अनेकांसाठी गावरान आंबा दुर्मिळ झाला आहे. अलीकडच्या काळात बाजारात विविध प्रजातीची आंबे विक्रीसाठी येत असले तरी ग्रामीण भागात गावरान आंब्यालाच विक्रमी मागणी असायची. त्याचे कारण ही तसेच होते.

कुठल्याही रासायनिक प्रक्रियेशिवाय पिकवलेला गावरान आंबा यावर्षी मात्र ग्रामीण भागासाठी लवकर चाखायला मिळणार असल्याचे चित्र दिसत आहे. आजी-आजोबांनी लागवड केलेली तर कोठे नैसर्गिक उगवण झालेल्या शेतातील गावरान आम्र वृक्षांची मोठ्या प्रमाणावर तोड झाल्याची दिसत आहे. गावरान अमराया नष्ट होऊन आमरसाची चव दुर्मिळ झाल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहावयास मिळत आहे.

'दादा लगाये आम और खाये पोता' या म्हणीप्रमाणे प्रत्येक गावागावात नामांकित गावरान आमराया





अस्तित्वात होत्या.


मात्र अलीकडील काळात शेतकऱ्यांनी झाडाखालची पिके वाढत नसल्याने गावरान आंब्याची विस्तीर्ण झाडे तोडून नवीन संकरित कलमीकरण केलेली विविध आंब्याच्या झाडाची लागवड केली त्यामुळे ग्रामीण भागात आता गावरान आंबे दुर्मिळ झाले. सध्या क्वचीतच एखाद्या ठिकाणी गावरान आंब्याचे झाडे दृष्टीस पडतात.

परिणामी खारक्या, नारळ्या, केसाळ्या, केळ्या, सेंद्र्या, शेप्या, खऊट, गोट्या, तुरट्या, चिकाळ्या आधी मौल्यवान गावरान आंब्याची सर्रासपणे सुरू झालेली वृक्षतोड आमराया दुर्मिळ होण्यास कारणीभूत ठरली.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावाकडे जायची वेगळीच घाई असायची. मीठा मिरच्या सोबत कच्चा कैरी खाण्याची वेगळीच मजा असायची. त्या खाऊन खेळण्या-बागडण्यात गेलेले बालपण आता जवळपास इतिहास जमा झाले आहे. असे म्हणणे वावगे ठरणार नाही. असे असले तरीही विरळ प्रमाणात असलेली आंब्याची झाडे यंदा बहरले असून पुढील वातावरण अनुकूल राहिल्यास गावरान चवीचा आनंद घेता येणार हे मात्र नक्की.

# विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास कृषी महाविद्यालयास मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास कृषी महाविद्यालयास मंजूर मिळावी यासाठी अनेक वर्षापासून प्रयत्न करण्यात आले होते. यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी प्रयत्न केला व त्यास कृषी महाविद्यालयास विनाअनुदानित परवानगी मिळालेली आहे. कृषी महाविद्यालय परवानगी मिळाले असल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना कृषीविषयक शिक्षण घेता येणार आहे.

भारत हा देश आपला कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे अनेक जण शेती व्यवसाय करत असल्याचे दिसून येत आहे पण शासकीय नोकरी मिळत नसल्यामुळे खाजगी कंपन्या पगार कमी देत असल्यामुळे महाजन कृषी कडे वळत असल्याचे दिसून येत आहे. शेतीमध्ये नवीन नवीन वापर केल्यामुळे शेतीमध्ये उत्पादन वाढ झाल्यामुळे आणि त्या चांगल्या उत्पादनाला चांगला दर मिळत असल्यामुळे दिसून येत आहे. ह्या पाशी मोरा अनेक विद्यार्थी शेतीविषयक अभ्यास करत असल्याची दिसून येत आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये उत्तर सोलापूर, अकलूज, पानिव, या तीन ठिकाणी सोलापूर जिल्ह्यामध्ये कृषी महाविद्यालय आहेत. आता गुरसाळे येथे विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर चौथी कृषी महाविद्यालय सुरू होणार आहे हो या महाविद्यालयामध्ये ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

# शिक्षणसंस्था अध्यक्ष संजय भोकरे यांच्या खुनाचा कट उधळला

## वादग्रस्त जमिनीसाठी सुपारी; तिघांना पिस्तूलांसह अटक; सांगलीत खळबळ: संजय भोकरे यांच्या हत्येचा कट पोलिसांनी हाणून पाडला; उत्तर प्रदेशातून आणली देशी पिस्तुले; खुनाच्या तयारीत तिघे जेरबंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली/विशेष प्रतिनिधी : सांगली शहरात मोठी खळबळ उडवून देणाऱ्या प्रकरणात संजय भोकरे यांच्या खुनाचा कट उधळण्यात सांगली पोलिसांना यश आले आहे. वादग्रस्त जमिनीच्या ताब्यासाठी सुपारी देऊन हत्या घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याची धक्कादायक माहिती तपासातून समोर आली असून या प्रकरणात तिघांना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून दोन देशी बनावटीची पिस्तुले, आठ जिवंत काडतुसे आणि धारदार चाकू जप्त करण्यात आले आहेत. या घटनेमुळे सांगली आणि मिरज परिसरात मोठी खळबळ माजली असून शहरात चर्चांना उधाण आले आहे.



या प्रकरणाची माहिती देताना अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर यांनी सांगितले की, गणेश चंद्रकांत लोखंडे (वय ३३, रा. हरिपूर रोड, सांगली), विराज प्रकाश बुटाले (वय ४१, रा. आंबेडकर रोड, सांगली) आणि संग्राम संभाजी फडतरे (वय २७, रा. पाटणे प्लॉट, हरिपूर रोड) या तिघांना अटक करण्यात आली आहे. या कटातील एक मुख्य संशयित अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या तिघांना न्यायालयाने सोमवार, दि. ११ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**पोलिसांच्या सापळ्यात आरोपी अडकले:**

पोलीस निरीक्षक संजीवकुमार झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक महादेव पोवार आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक या प्रकरणाचा तपास करत होते. अंकली ते काळीवाट रस्त्यावर काही संशयित मारुती कार (एमएच १० एबी ५९३५) मधून एकत्र येऊन गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची योजना आखत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ सापळा रचून वाहन अडवले आणि तिघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले.

झडतीदरम्यान आरोपींकडून दोन देशी बनावटीची पिस्तुले, आठ जिवंत काडतुसे, एक धारदार चाकू आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले. विशेष म्हणजे गुन्हा करताना वाहनाची ओळख पटू नये यासाठी कारवर बनावट नंबर प्लेट लावण्यात आल्याचेही तपासात उघड झाले आहे.

**एस.बी.जी.आय. जवळील वादग्रस्त जमिनीमुळे कट:**

तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, एसबीजीआय अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळील वादग्रस्त जमीन हे या कटामागील मुख्य कारण असल्याचे समोर आले आहे. संबंधित जमीन फरार संशयित सचिन आवळे आणि त्याच्या सहहिस्सेदारांच्या मालकीची असल्याचे सांगितले जात आहे. मात्र त्या जमिनीवर संजय भोकरे यांचा ताबा असल्यामुळे आरोपींनी त्यांना हटविण्याचा कट रचला होता.

भोकरे यांचा खून करण्यात यश मिळाल्यास जमीन ताब्यात घेणे सोपे जाईल आणि त्यासाठी मोबदला दिला जाईल, असे आमिष आरोपींना दाखविण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या कटासाठी आरोपींनी अनेक दिवस नियोजन केले होते.

**उत्तर प्रदेशातून आणली पिस्तुले:**

पोलिसांच्या तपासात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. आरोपी गणेश लोखंडे आणि संग्राम फडतरे यांनी फेब्रुवारी महिन्यात उत्तर प्रदेशातील सोनभद्र येथून दोन देशी बनावटीची पिस्तुले आणि काडतुसे खरेदी केली होती. या शस्त्रांचा वापर करून संजय भोकरे यांच्यावर हल्ला करण्याचा कट होता.

आरोपींनी भोकरे यांच्या हालचालींवर काही दिवसांपासून लक्ष ठेवले होते. ते 'दैनिक जनप्रवास' कार्यालयात कधी येतात, कोणत्या मार्गाने प्रवास करतात, कोणत्या वेळी एकटे असतात याची रेकी करण्यात आली होती. योग्य संधी साधून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्याची तयारी सुरू होती, अशी कबुली आरोपी विराज बुटाले याने पोलिसांना दिल्याचे अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**शहरात खळबळ; पोलिसांकडून तपास तीव्र!**

या घटनेनंतर सांगली शहरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी तपास अधिक तीव्र केला आहे. या कटामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, आरोपींना आर्थिक मदत कोणी केली, सुपारीची रक्कम किती होती आणि या कटामागील मुख्य सूत्रधार कोण आहे याचा शोध पोलीस घेत आहेत.

या प्रकरणी सांगली शहर पोलीस ठाण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे हवालदार संदीप पाटील यांच्या फिर्यादीवरून अवैध शस्त्र बाळगणे, हत्येचा कट रचणे आणि अन्य गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मुख्य सूत्रधारावर कठोर कारवाई व्हावी**

दरम्यान, संजय भोकरे यांनी या घटनेवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, संबंधित जमीन ही संस्थेची असून तिच्या मालकीहक्काबाबत न्यायालयात खटला सुरू आहे. कायदेशीर मार्गाने वाद सुरू असताना अशा प्रकारे जीव घेण्याचा कट रचला जाणे धक्कादायक आहे. या कटामागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन त्याच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे सांगली जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून पोलिसांनी वेळीच कारवाई केल्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# विवेकवर्धिनी विद्यालयात गुणवंत सत्कार संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री दादासाहेब सौंदळी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित ग्रीक वर्धनी विद्यालय येथे दहावीत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्था व प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला यावर्षी दहावी बोर्ड परीक्षेच्या सरासरी निकाल ८८.८८% लागला आहे.

यामध्ये प्रथम गायत्री भागवत बडवे ९८%, दुतीय शिवप्रसाद उमेश देवमारे ९६.६०%, तृतीय तनिष्का सतीश गाडेकर ९४.२०%, तसेच शेषनारायण माने ९२.४०%, समीक्षा राहुल काटे ९१% समृद्धी नितीन कचरे ९०.६०% स्वरूप संतोष बारस्कर १९.८०% मिळाली.

या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवले आहे या यशस्वी विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांचा सत्कार प्राचार्य डॉक्टर मुंडे यु आर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी डॉक्टर मुंडे म्हणाले की प्रशालेत केलेल्या विविध सुविधा व विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत त्यामुळे आमच्या शाळेची उज्वल परंपरा विद्यार्थ्यांनी टिकून ठेवले आहे यावेळी पालक व विद्यार्थ्यांनी प्रशालीतील शैक्षणिक सुविधा व शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश प्राप्त झाल्याचे आपल्या मनोगतात सांगितले यावेळी गुणवंत विद्यार्थी मार्गदर्शक शिक्षक व पालक यांचाही सत्कार करण्यात आला.



यावेळी उपमुख्याध्यापक दराडे व्हीएस उपप्राचार्य शिंदे ए.जी. परीक्षक पवार ए. ए .भोसले एम. ए. सर्व शिक्षक पालक विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितोळे एस.एम. यांनी केले.

# पंढरपूर अर्बन बँकेला दोन लाखाचा दंड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रिझर्व बँक ऑफ इंडियाने पंढरपूर अर्बन बँकेने नियमाचे उल्लंघन केल्याबद्दल दोन लाख रुपये दंड एका बँकेवर आयसीआय बँकेने दंडात्मक कारवाई केली आहे.

मुंबईतील बँक पंढरपूर अर्बन बँक अशा दोन बँकेला दंड करण्यात आला आहे. याबाबत मुख्य अर्बन बँकेवर निर्बंध वाढवलेले आहे. बँक मनमानी कारभार करत असल्यामुळे बँक अडचणीत येत आहे. त्यामुळे ठेविधानाच्या रकमा बुडत असल्यामुळे आरबीआय ने खाजगी बँकांना नियम व अटी लाभले आहेत याची काटकोरपणे अंमलबजावणी होते का नाही याची पाहणी करण्यात येणार आहे. मुंबई व पंढरपूर अर्बन बँकेने नियमाचे उल्लंघन केल्याची दिसून येत असल्यामुळे . बँकेने इन्फी मध्ये गेलेल्या कर्जदारांना पुन्हा कर्ज दिल्यामुळे पहिले कर्ज नफेडता नवीन कर्ज दिले त्यामध्ये नियमाची उल्लगन केल्याबद्दल अर्बन बँकेला दोन लाख रुपयांचा दंड ठोकण्यात आला आहे. अर्बन बँकेला रिझर्व बँकेने नोटीस दिली होती. नोटीसाला उत्तर देताना समाधानी कारक उत्तर आले नाही. आले नसल्यामुळे या दोन बँकांना दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. यामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.



# निरोगी आरोग्यासाठी योग्य आहार व व्यायामाची गरज : डॉ. संगीता देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग/प्रतिनिधी : फास्ट फुडच्या जमान्यामध्ये जागरूक पद्धतीने आपला आहार आणि विहार असला पाहिजे. तो योग्य नसल्याने अनेक आजारांना आमंत्रण मिळते. निरोगी आरोग्यासाठी वेलनेस व फिटनेस सेंटरच्या माध्यमातून व्यायामाबरोबरच नागरिकांना योग्य आहाराचे मार्गदर्शन करण्यात येते. त्यामुळे मानसाला मिळालेलं आयुष्य सुखी व आनंदी घालवण्यास मदत होईल, असे प्रतिपादन डॉ. संगीता देशमुख यांनी बोलताना व्यक्त केले.

वैराग येथील बार्शी रोडवरील आयुष वेलनेस व फिटनेस सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रचनाताई संतोष निंबाळकर ह्या होत्या. जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती मकरंद निंबाळकर, नगरसेवक शाहूराजे निंबाळकर, माजी नगरसेवक विलास रेनके, केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर जाधव, आरोग्य सल्लागार नवनाथ हजारे, वर्षा हजारे या मान्यवरांच्या उपस्थितीत आयुष्य फिटनेस व वेलनेस सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये माजी प्राचार्य - हरिश्चंद्र भोसले, मार्केट कमिटीचे संचालक - नेताजी घायतिडक, मुख्याध्यापक - तात्यासाहेब करंडे, डॉ. संगीता देशमुख, डॉ. सई गुंड, डॉ . सुधीर घोडके, डॉ. अतुल कुंभारे, ह भ प रंगनाथ काकडे, नगरसेवक श्रीशैल भालशंकर, आनंद घोटकर, बाबासाहेब रेड्डी, चंद्रकांत तावसकर, अशोक पांचभाई, वैशाली नावगुडे दिपाली माने आदी.

सोनाली घोटकर, गजानन घोटकर, तुकाराम पाटील, नागनाथ जाधव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## तहसील कार्यालयातील जनरेटर बनले केवळ शोभेची वास्तू

# तहसील कार्यालयातील जनरेटर दुरुस्त न झाल्यास भिम शक्तीचे प्रदेश अध्यक्ष अर्जुन काकडे स्व खर्चातून करणार दुरुस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मात्रतीर्थ सिंदखेडराजा तहसील कार्यालयामध्ये दिनांक सहा मे रोजी लाईट नसल्यामुळे दिवसभर तहसील कार्यालयामधील महत्त्वाची कामे ठप्प होती व या बाबत तालुक्यातील बऱ्याच नागरिकांचे कामे जनरेटर असूनही दुरुस्त नसल्याने अधिकाऱ्याचे आरामाचे कारण बनले याबाबत काही जागृत पत्रकारांनी आवाज उठवला. लाईट नसल्यामुळे जनरेटर किंवा इनव्हेटर लावून कामकाज करायचे असते परंतु भले मोठे जनरेटर नादुरुस्त असल्यामुळे लाईटवरच कर्मचाऱ्यांना अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे दिवसभर नागरिकांच्या कामाचा बट्ट्याबोळ झाला असून कुठले ही काम न झाल्या मुळे लोकांना मानसिक आर्थिक व शारीरिक त्रास सुद्धा सहन करावा लागला,



या बाबत भिम शक्ती चे प्रदेश अध्यक्ष, अर्जुन काकडे साहेब यांनी याबाबत जर ०७ दिवसात जनरेटर प्रशासनाने दुरुस्त केले नाही तर आम्ही स्व खर्चातून जनरेटर दुरुस्त करण्यासाठी तहसीलदार यांना वर्गणी देण्यात येईल असे त्यांनी सांगितले जनरेटर मुळे कुठल्याही प्रकारचे कामकाज ठप्प राहता कामा नये अनेक नागरिक मोठ्या अपेक्षा घेऊन तहसील कार्यालयामध्ये येत असतात आणि केवळ लाईट नसल्यामुळे दिवसभर कामकाज ठप्प राहणे हे काही योग्य नाही याबाबत जिल्हाधिकारी त्याचबरोबर महसूलमंत्री यांना सुद्धा परिस्थिती कळवून मंत्रालयात धाव घेण्यात येईल असे सुद्धा त्यांनी सांगितले. मात्र आता जनरेटर स्व खर्चातून दुरुस्त होते की प्रशासन दुरुस्त करते हे पाहणे महत्वाचे असून तालुक्यातील नागरिकांचे लक्ष वेधले आहे.




# लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात प्रोजेक्ट सादरीकरण संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांचे AI आणि HOT परीक्षा सादरीकरण आयोजित करण्यात आले. या साध्य करण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी प्रवेशक समिती यामध्ये नॉमिनी म्हणून डॉक्टर एस एस कावळे सर सहाय्यक (प्राध्यापक कृषी अर्थशास्त्र विभाग महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी) हे लाभले होते. यांचे स्वागत लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाची प्राचार्य डॉक्टर सचिन फुगे सर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून कृषी उत्पन्न बाजार समिती बँक प्रक्रिया उद्योग तसेच विविध शेती उद्योग जोडधंदे फायनान्शिअल कन्सल्टन्सी तसेच इतर विविध उद्योगांचा अभ्यास व अभ्यास करून संलग्नित प्रकल्पाचा नफा तोटा तसेच यामध्ये होणे येणारे अडथळे त्यावरती उपाय योजना यावरती प्रकल्प सादर केला त्याचबरोबर शैक्षणिक सहल या उपक्रमाद्वारे विविध संशोधन केंद्राचा अभ्यास तसेच दुसऱ्या राज्यातील संस्कृती याविषयी अभ्यास केला आहे.

या साजरीचे प्रकल्प करत असताना विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सचिन फुगे सर, प्रकल्प प्रकल्प समय प्राध्यापक स्वप्निल कदम मॉडेल इन्चार्ज प्राध्यापक स्मिता धायगुडे, प्राध्यापक रोहिणी सोमवंशी, प्राध्यापक मयुरी क्षीरसागर, विशेष विषय तज्ञ प्राध्यापिका ज्योती गायकवाड, प्राध्यापक अमोल डाके यांचे विशेष मार्गदर्शन झाले तसेच या अंतिम परीक्षा सादरीकरण करतेवेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक वर्ग तसेच महाविद्यालयाची विद्यार्थी उपस्थित होते.